**आदेश निशाणी क्र. २२**
( पारीत दिनांक १७ माहे जून २०२५ )

**०१.** प्रतिवादी क्र. ४ ने सदरच्या अर्जाद्वारे दावा त्याच्या विरुद्ध विना कैफियत चालविण्याचा झालेला आदेश रद्दबातल ठरवून अर्जासोबत दाखल केलेली त्याची लेखी कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी, अशी मागणी केलेली आहे.

**०२.** सदर प्रतिवादीनुसार, तो शेतकरी असुन सदर प्रकरणाबाबत त्यास योग्य ती माहिती वेळेत न मिळाल्यामुळे, शिवाय कागदपत्रे वेळेत मिळालेले नाहीत, त्यामुळे तो लेखी कैफियत वेळेवर दाखल करू शकला नाही. त्यायोगे दिनांक १७/१२/२०२४ रोजी त्याच्याविरूद्ध दावा विना लेखी कैफियत चालविण्याचा आदेश झालेला आहे. त्याच्यानुसार, त्याने लेखी कैफियत दाखल करण्यास जाणीवपूर्वक टाळले नाही; परंतु प्रकरण हे स्थावर मिळकतीचे असुन त्यात त्याचे हितसबंध गुंतलेले आहेत. तेव्हा त्याला लेखी कैफियत सादर करण्याची संधी दिली नाही तर त्यांचे पैशाच्या स्वरुपात न भरून येणारे नुकसान होईल म्हणून त्याने अर्ज मंजूर करावा आणि त्याच्याविरुद्ध दावा विना लेखी कैफियत चालविण्याचा झालेला आदेश रद्दबातल करून त्याची लेखी कैफियत दाखल करून घ्यावी, अशी त्याने विनंती केलेली आहे.

**०३.** वादींनी सदरच्या अर्जाला प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज खोटा व काल्पनिक आहे, त्यांच्या अर्जामधील कारण संयुक्तीक नाही, या सबबीखाली तो नामंजूर करावा आणि यदाकदाचित मंजूर केलाच तर प्रतिवादींवर परिव्यय लादून तो त्यास नुकसान भरपाई म्हणून द्यावा, अशी मागणी केलेली आहे.

**०४.** सदर प्रतिवादींच्या वतीने वकील श्री. पी. व्ही. ढगे यांना तर वादींच्या वतीने वकील श्री. जी. पी. लावंड यांना ऐकले.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, सदर प्रतिवादीस समन्स दिनांक १९/०६/२०२४ रोजी तामील झालेले आहे आणि त्याने सदरचा अर्ज हा दिनांक १३/०६/२०२५ रोजी दिलेला आहे, जेव्हा की, दावा त्याच्या विरुद्ध दावा दि. १७/१२/२०२४ रोजीच्या आदेशानुसार विना कैफियत चालविण्यात आलेला आहे. तेव्हा सदर प्रतिवादीने लेखी कैफियत विलंबाने सादर करण्यासाठी जे कारण दिलेले आहे, ते सयुंक्तीक नाही, हे सुस्पष्ट होते. असे जरी असले तरी दाव्याचा निकाल गुणवत्तेवर आणि अंतिमरित्या होण्यासाठी प्रतिवादीचा बचाव अभिलेखावर येणे आवश्यक आहे. शिवाय प्रकरण हे स्थावर मिळकतीसबंधाने असल्याने आणि सदर प्रतिवादीनुसार त्याच्या हितसबंध त्यात गुंतलेले आहे तेव्हा त्यास लेखी कैफियत सादर करण्यास संधी देणे आवश्यक आहे; मात्र त्याने केलेल्या दिरंगाईकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. पक्षकारांनी हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, अशा प्रकरणामध्ये कल्याणकारी शासन म्हणून शासन स्वस्त न्याय देण्यासाठी कार्यवाहीवर मोठा खर्च करीत असते, तेव्हा त्यांनी योग्य त्या टप्प्यावर योग्य ती कृती करणे अपेक्षित आहे आणि जो पक्षकार अशा प्रकारे कृती करणार नाही आणि ती कृती करू शकण्यास सकारण स्पष्ट करणार नाही तो अशा शासनाच्या लाभासाठी पात्र ठरणार नाही. त्याच्या दिरंगाईमुळे शासनाच्या होणा—या खर्चाची भरपाई करण्यासाठी तो जबाबदार ठरेल. ऐवढेच नाही तर तो विरुद्ध पक्षास भरपाई देण्यासही जबाबदार ठरेल. सदर प्रकरणात सदर प्रतिवादीची दिरंगाईची कृती ही सकारण नाही, तेव्हा तो होणा—या शासनाच्या खर्चाची आणि वादीस भरपाई देण्यास जबाबदार ठरतो.

तेव्हा अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :

**आदेश**

१. अर्ज रुपये ५००/— परिव्यय लादून मंजूर करण्यात येत आहे;

२. सदर प्रतिवादींनी परिव्यय रक्कम पुढील तारखेपर्यंत भरल्यानंतर रुपये ३००/— वादींना भरपाई म्हणून देण्यात येतील तर उर्वरीत हे कार्यवाहीचा खर्च म्हणून शासनजमा करण्यात यावेत;

३. परिव्यय हा अर्जदार/सदर प्रतिवादींवर राहील.

स्वाक्षरित/—
दिनांक: १७.०६.२०२५ **(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Botre (Grade-II) |
| Name of Court | : | Civil Court Senior Division Bhoom Tq. Bhoom Dist.Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 17.06.2025 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 17.06.2025 |
| Order/ Judgment uploaded on | : | 18.06.2025 |